# मराठी

**वेळ - ३ तास** **गुण - ८०**

## कृतिपत्रिका

**कृतिपत्रिकेसाठी सूचना :**

( १ ) आकलन कृती व व्याकरण यांमधील आकृत्या किंवा चौकटी पेनाने अथवा पेन्सिलीने व्यवस्थित काढाव्यात.

( २ ) स्वच्छता , नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

## विभाग १ - गद्य

**[ २० ]**

**कृती १. (अ) खालील उताऱ्या च्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **( ८ )**

( १ ) ब्रिगेडियर ठाकूर यांनी लेखिकेला केलेल्या विनंती वजा सूचनाः ( २ )

( य ) ---------------

( र ) ---------------

( २ ) ( य ) मिशन लडाखच्या गेल्या पाच वर्षांत लेखिकेला झालेली जाणीवः ---- ( १ )

( र ) १९९९ मधील कारगिल युद्धाच्या वेळी असलेले कर्नल : -------- ( १ )

गेल्या पाच वर्षात एक मात्र निश्चित जाणवलं, की तिथे गेल्यावर आपला अहंकार, बडेजाव आणि प्रतिष्ठितपणाची चढलेली पुटं निखळून पडताहेत. लडाखच्या भिन्न भिन्न दऱ्याखोऱ्यात भन्नाट एकाकी, रौद्र आणि हिरवळीचा दुरान्वयानेही संबंध नसलेल्या कठीण भूप्रदेशात राहूनही ममत्व, बंधुभाव जपणाऱ्या, नाती जोडणाऱ्या आणि ती टिकवणाऱ्या सैनिकांना भेटलं, की 'आपली माणसं' भेटल्याचा गहिवर दाटून येत आहे. आपले सैनिक हे हिरे आहेत. त्यांना आपण जपलं पाहिजे. त्यांच्याबद्दल कृतज्ञ राहिलं पाहिजे.

आम्ही पाच वर्ष रक्षाबंधनासाठी लडाखला ग्रुप घेऊन येत आहोत, याचं प्रचंड अप्रूप वाटून ब्रिगेडियर कुशल ठाकूर या सोहळ्यासाठी आणि आम्हांला भेटायला आवर्जून आले होते. १९९९ मधील कारगिल युद्धाच्या वेळी कर्नल असलेले कुशल ठाकूर तोलोलिंग फत्ते करण्याच्या योजनेचे शिल्पकार होते. ते आमच्यासारख्या सामान्य माणसांना भेटायला येतात, याच्यापरता मोठा सन्मान तो कोणता?

आमच्याशी संवाद साधत असताना ब्रिगेडियर ठाकूर आम्हांला म्हणाले, "तुम्ही पाच वर्षांचा वादा केलात आणि तो निभावलात, ह्याबद्दल अभिनंदन; पण माझा प्रेमाचा, वयाचा अधिकार आणि हक्क वापरून सांगतो, तुम्ही हे मिशन बंद करू नका. इथे नेहमी या. आमच्या तरुण जवानांना भेटा त्यांचा हौसला बुलंद करा. तुमच्या शहरातील कुशाग्र बुद्धीच्या मुलांना सांगा, आम्हांला त्यांची गरज आहे.

( ३ ) स्वमत-अभिव्यक्ती ( ४ )

ब्रिगेडियर ठाकूर यांनी शहरातील कुशाग्र बुद्धीच्या मुलांना मार्गदर्शन करण्याची विनंती लेखिकेला करण्यामागे तुम्हाला जाणवणारी कारणे लिहा.

किंवा

सैनिक आणि सामान्य माणूस यांच्या जीवनशैलीतील फरक स्पष्ट करा.

**( आ ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा** **( ८ )**

( १ ) प्रस्तुत उताऱ्यात लेखकाने उत्तररात्रीच्या आगमनाची सांगितलेली दोन वैशिष्ट्ये लिहा. ( २ )

( य ) ----------

( र ) ----------

( २ ) उताऱ्याच्या आधारे खालील चौकटी पूर्ण करा. ( २ )

( य ) लेखकाने वर्णन केलेली दोन फुले [ ] [ ]

मध्यरात्र केव्हाच उलटून गेलेली असते. उत्तररात्रीनं हलकेच आकाशात पाऊल ठेवलेलं असतं. इतकं. हळूवारपणे, इतकं अलगद, इतकं मुलायम, की कुणाला चाहूलदेखील लागू नये; पण ही चाहूल मला मात्र सहज लागते. तिच्या पावलांची मंद मंद नाजूक स्पंदनं माझ्या मनात मात्र कुठं तरी उमटत राहतात. जणू त्यामुळंच मग माझा डोळा लागत नाही. पुरेशी झोप झाली आहे, असं वाटत राहातं.

मी हलकेच उठतो. चूळ भरतो. डायनिंग टेबलजवळ येतो. त्याच्याजवळची खिडकी हलकेच उघडतो. रात्रीच्या नीरव शांततेची निद्रा भंग होऊ नये म्हणून. बाहेर पाहातो तो आसमंतात काळा कुळकुळीत अंधार दाटलेला. बागेतल्या साऱ्या झाडांचा, साऱ्या वेलींचादेखील डोळा लागलेला. त्यांच्यावरची पाखरंदेखील गाढ झोपलेली. त्यांचा चिवचिवाट अजून सुरू झालेला नसतो, कारण आता फक्त पहाटेचे तीन - साडेतीन तर वाजलेले असतात. का कुणास ठाऊक, ही वेळ मला फार आवडते. सारं जग साखरझोपेत असतं. साऱ्या चिंता - काळज्या मिटल्या-विरलेल्या असतात. मन कसं समेवर आलेलं असतं. मला वाटतं, आपलं खरंखुरं मन हेच असतं, जे सुखदुखांच्या पलीकडे कुठंतरी दूर दूर गेलेलं असतं. आपलंच नव्हे तर या दुधाळ सायलीचंदेखील. तांबडसर बोगनवेलीचंदेखील .केशरी गुलमोहोराचंदेखील. जांभुळसर जॅक्रांडाचंदेखील किरमिजी-निळसर-पिवळसर इवलाल्या इंद्रधनुष्यी फुलांच्या घाणेरीचंदेखील. पांढऱ्याशुभ्र नि रक्तचंदनी चाफ्याचंदेखील.

( ३ ) स्वमत:अभिव्यक्ती - ( ४ )

'मन समेवर येणे' 'आपल खरंखुरं मन हेच असतं, जे सुखदु:खाच्या पलीकडे कुठंतरी दूर दूर गेलेलं असतं', या विधानाचा तुम्हाला कललेला आशय तुमच्या शब्दांत लिहा.

किंवा

उत्तररात्रीच्या आगमनाचे वर्णन तुमच्या शब्दांत करा.

**( इ ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **( ४ )**

( १ ) ( य ) सत्यशोधक समाजाचे संस्थापक: ------------------------------- ( १ )

( र ) सत्यशोधक समाजात प्रवेश करताना करावी लागणारी कृती : ------- ( १ )

महात्मा जोतिराव फुले यांनी १८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाजात सभासद होताना तळी उचलून पुढीलप्रमाणे प्रतिज्ञा करावी लागे."सर्व मनुष्य जात एकाच ईश्वराची लेकरे आहेत. त्यांचे व माझे बंधुत्वाचे नाते आहे, हे जाणून वागण्याचा मी नित्य प्रयत्न करीन. देवाची भक्ती, उपासना वगैरे करताना तसेच धर्म विधी करताना मी कोणाही मध्यस्थाची जरूर ठेवणार नाही व असे वागण्याविषयी मी इतरांचे मन वळविण्यासाठी झटेन. मी स्वतः शिकून मुलामुलींस विद्या शिकविल्या शिवाय राहणार नाही. राज्यकर्त्यांशी एकनिष्ठेने वागेन. अशी सर्व साक्षी सत्यस्वरुप परमात्म्याला स्मरून मी प्रतिज्ञा करतो. हा माझा पवित्र उद्देश

सिद्धीस नेऊन जन्माचे सार्थक करण्यास परमेश्वर मला सामर्थ्य देवो." ही प्रतिज्ञा इ. स. १८९१ मध्ये, पुणे येथे भरलेल्या सत्यशोधक समाजाच्या सभेत मंजूर केली.

( २ ) खालील विधाने पूर्ण करा. ( २ )

( य ) मी स्वतः शिकून -------------------------------------

( र ) प्रतिज्ञा मंजूर करण्यात आली ती सभा : ----------------------------------

## विभाग २ - पद्य [१६]

**कृती २. ( अ ) खालील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा: ( ८ )**

( १ ) शेतकरी स्त्री करीत असलेली कामे : ( २ )

( य ) ---------------

( र ) ----------------

( २ ) खालील वर्णनासाठी कवितेत आलेल्या ओळी लिहा. ( २ )

( य ) अतोनात कष्टानंतर हिरव्या समृद्धीच्या स्वरूपात शिल्लक राहते.

( र ) स्वतःचा जीवच जणू कांद्याच्या रोपाच्या रुपात लावते.

सरी-वाफ्यात, कांदं लावते
बाई लावते
नाही कांद ग. जीव लावते
बाई लावते
काळ्या आईला, हिरवं गोंदते
बाई गोंदते

रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते
फुल सोन्याची, झेंडू तोडते
बाई तोडते
नाही फुलं ग, देह तोडते
बाई तोडते

घरादाराला, तोरण बांधले
बाई बांधते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते
ऊस लावते, बेणं दाबते
बाई दाबते
नाही बेणं ग, मन दाबते
बाई दाबते

कांड्या-कांड्यांनी, संसार
बाई सांधते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते
उन्हातान्हात, रोज मरते
बाई मरते

हिरवी होऊन, मागं उरते
बाई उरते
खोल विहिरीचं, पाणी शेंदते
बाई शेंदते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते

( ३ ) अभिव्यक्ती ( ४ )

तुमच्या परिसरातील कष्टकरी स्त्रियांचे कुटुंबाच्या उदरनिर्वाहातील योगदान स्पष्ट करा.

**( आ ) खालील कवितेच्या ओळींचा अर्थ लिहा. ( ४ )**

विंचू चावला वृश्चिक चावला ।
कामक्रोध विंचू चावला ।
तम घाम अंगासी आला ।।धृ ।।

ह्या विंचवाला उतारा ।
तमोगुण मागे सारा ।
सत्त्वगुण लावा अंगारा ।
विंचू इंगळी उतरे झरझरां ।।३। ।

**( इ ) खालीलपैकी कोणतीही <u>एक</u> कृती सोडवा. ( ४ )**

काव्य सौंदर्य : समुद्र कोंडून पडलाय गगनचुंबी इमारतींच्या गजांआड.

तो संत्रस्त वाटतो संध्याकाळीं : पिंजारलेली दाढी, झिंज्या.

हताशपणे पाहत असतो समोरच्या बत्तिसाव्या मजल्यावरील मुलाकडे,

ज्याचं बालपण उंचच उंच पण अरुंद झालंय

आणि त्याची त्याला कल्पनाच नाही.

**वरील ओळींतील आशय सौंदर्य स्पष्ट करा.**

**किंवा**

रंगुनी रंगांत साऱ्या रंग माझा वेगळा !
गुंतुनी गुंत्यांत साऱ्या पाय माझा मोकळा !

कोण जाणे कोठुनी ह्या सावल्या आल्या पुढे;
मी असा की लागती ह्या सावल्यांच्याही झळा !

**वरील काव्यपंक्तींचे रसग्रहण करा.**

## विभाग ३ - साहित्यप्रकार : कथा

**कृती ३. खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा : ( ४ )**

**( अ )** ( १ ) <u>एका</u> वाक्यात उत्तरे लिहा :

( य ) कथा उत्कर्ष बिंदूपर्यंत पोहोचण्यामागील कारण लिहा. (१)

( र ) कथेतील भाषा योजनेचे घटक लिहा. (१)

कथेत चांगल्या-वाईटाचा संघर्ष असतो. त्यातूनच नाट्यमयता निर्माण होते. या संघर्षातूनच कथा उत्कर्ष बिंदूपर्यंत पोहोचते. कथेत प्रत्येक वेळी संघर्ष किंवा नाट्य हे वाईट घटनांचेच असते असे नाही, तर आनंद आणि सुखात्मिक घटनांतूनही नाट्यमयता निर्माण होते. कथेच्या शेवटी कथेतील अनुभवांचा, घटनांचा उत्कर्ष बिंदू नाट्यपूर्णरीतीने साधता येतो; पण तरीही कथानकाच्या ओघात स्वाभाविकपणे झालेला शेवट वाचकाला आकर्षित करतो.

कथेतील संवाद हे चटपटीत, आकर्षक, वाचकाच्या भावविश्वाला स्पर्श करणारे आणि कथानकाला प्रवाही ठेवणारे असतात. पात्रांच्या स्वभाव धर्मानुसार व परिस्थितीजन्य घटकांनुसार संवाद लिहिले जातात. या संवादात लय व आंतरिक संगती महत्त्वाची असते, संवादातून रसनिर्मिती आणि रसपरिपोष होत असतो, अर्थपूर्ण संवाद कथेला वेगळी उंची प्राप्त करून देतात.

कथानक भाषेच्या मदतीने साकार होत असते. कथेतील पात्रांच्या स्वभाव वैशिष्ट्यांनुसार व कथेतील वातावरणानुसार भाषेची योजना केली जाते. कथाकार, त्याचा दृष्टिकोन, त्याची अनुभव घेण्याची पद्धत यांनुसार कथेचे भाषारूप आणि शैलीविशेष निश्चित होत जातात. कथा लिहिताना साधारणतः प्रमाण भाषा आणि बोली भाषा यांची सरमिसळ केली जाते. तसेच कथा पूर्णपणे बोलीभाषेतही लिहिली जाते.

( २ ) कथेतील संवादाची वैशिष्ट्ये लिहा. ( २ )

( आ ) खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> कृती सोडवा : ( ६ )

( य ) अनुच्या स्वभाववैशिष्ट्यांचे वर्णन करा.

( र ) कथेच्या 'शोध' या शीर्षकाची समर्पकता तुमच्या शब्दांत पटवून द्या.

( ल ) बापू गुरुजींनी गावातील शाळेसाठी केलेले प्रयत्न तुमच्या शब्दांत लिहा.

( व ) बोर्डिंगमधील मुलांचे बापू गुरुजींबद्दलचे प्रेम तुमच्या शब्दांत लिहा.

## विभाग ४ - उपयोजित मराठी [१४]

**कृती ४. ( अ ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा : ( ४ )**

( १ ) मुलाखत घेताना घ्यावयाची काळजी लिहा.

( २ ) माहितीपत्रकाची गरज स्पष्ट करा.

( ३ ) अहवालाची आवश्यकता लिहा.

( ४ ) वृत्तलेखनाचे स्वरूप स्पष्ट करा.

**( आ ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा : (१०)**

( १ ) वृत्तलेखानाची शैली खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करा :
वृत्तलेखनाचा प्रारंभ ..... जिज्ञासेची पूर्ती ...... मध्य ...विवेचनाला संधी .......
वाचकांची जिज्ञासा .....

( २ ) खालील मुद्द्यांच्या आधारे मुलाखतीचा समारोप स्पष्ट करा :
भाषिक कौशल्ये ... परिणामकारक निवेदन....... अनपेक्षित समारोप ....
श्रोत्यांचा प्रतिसाद ..... मुलाखतीचे फलित.

( ३ ) वास्तवदर्शी लेखन हा अहवालाचा आत्मा आहे, हे खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करा.
वस्तुनिष्ठता ......विश्वसनीयता ...... नि:पक्षपातीपणा .....वास्तवदर्शी लेखन.... सोपेपणा.

( ४ ) 'माहितीपत्रक म्हणजे अप्रत्यक्षपणे जाहिरात', हे खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करा.
आकर्षक माहितीपत्रक .......कल्पकता ......विश्वसनीयता ........ ग्राहक फायदा.....
...सेवासुविधा.

## विभाग ५ - व्याकरण व लेखन

**[ २० ]**

**व्याकरण घटक व वाक्प्रचार.**

**कृती ५. ( अ ) सूचनेनुसार कृती करा : ( १० )**

( १ ) योग्य पर्याय निवडा. ( १ )

( य ) माणसं स्वतःचा छंद कसा विसरु शकतात ?

वरील विधानाचे विधानार्थी वाक्य ओळखून लिहा.

( १ ) माणसं स्वतःचा छंद नेहमी विसरतात.

( २ ) माणसं स्वतःचा छंद लक्षात ठेवतात.

( ३ ) माणसं स्वतःचा छंद विसरू शकत नाही

( ४ ) माणसं स्वतःचा छंद किती लक्ष ठेवतात,

( र ) सूचनेनुसार सोडवा. ( १ )

भारतीय संघ पराभूत झाला नाही (विधान होकारार्थी करा.)

( २ ) ( य ) योग्य पर्याय निवडा. ( १ )

' प्रतिक्षण ' या सामासिक शब्दाचा समास ओळखून लिहा.

( १ ) अव्ययीभाव समास

( २ ) तत्पुरुष समास

( ३ ) द्वंद्व समास

( ४ ) बहुव्रीही समास

( र ) 'दशदिशा' या सामासिक शब्दातील समासाचे नाव लिहा. ( १ )

( ३ ) ( य ) योग्य पर्याय निवडा. ( १ )

'तबेल्यातून व्रात्य घोड़ा अचानक पसार झाला', या वाक्यातील प्रयोग ओळखून लिहा.

( १ ) भावे प्रयोग

२ ) कर्मणी प्रयोग

( ३ )  कर्तरी प्रयोग

( ४ )  यापैकी नाही

( र )   कर्मणी प्रयोग असलेले वाक्य ओळखा. ( १ )

( १ )  त्यांनी आम्हाला दृक्-श्राव्य दालनात नेले.

( २ )  भाग्यश्री जणू आमच्यात नव्हतीच.

( ३ )  आम्ही धैर्याचा मुखवटाच चढवला होता.

( ४ )  सैनिकाने शत्रूला सीमेवर रोखले.

( ४ )     ( य )   योग्य पर्याय निवडा. ( १ )

दमडिचं तेल आणलं,

सासूबाईचं न्हाण झालं

मामंजीची दाढी झाली,

भावोजीची शेंडी झाली

उरलं तेल झाकून ठेवलं,

लांडोरीचा पाय लागता

देशीपर्यंत ओघळ गेला,

त्यात उंट पोहून गेला.

वरील काव्यपंक्तीतील अलंकार ओळखून लिहा.

( १ ) अनन्वय अलंकार

( २ ) अतिशयोक्ती अलंकार

( ३ ) अर्थानारन्यास अलंकार

( ४ ) अपनहुती अलंकार

( र )   उपमान ओळखा. ( १ )

'सागरासारखा गंभीर सागरच!' या वाक्यातील उपमान ओळखा.

( ५ )     ( य )'मन समेवर येणे' या वाक्प्रचाराचा अर्थ खालील पर्यायातून ओळखून लिहा. ( १ )

( १ ) मन चंचल होणे.

( २ ) मनाची उलथापालथ होणे.

( ३ ) मन शांत व एकरूप होणे.

( ४ ) यापैकी नाही.

( र ) 'मन समेवर येणे ' या वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा. ( १ )

( आ ) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयांवर २०० ते २५० शब्दांत निबंध लेखन करा. ( १० )

( १ ) मी पाहिलेला क्रिकेटचा सामना

( २ ) माझा आवडता कलावंत

( ३ ) मी नापास झालेला विद्यार्थी बोलतोय....

( ४ ) सूर्य उगवला नाही तर......

( ५ ) आजच्या समाजातील स्त्री चे स्थान

***